आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३ मार्च २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

●इराण विरुद्धचं युद्ध आणखी काही आठवडे सुरू ठेवण्याचा ट्रम्प यांचा इशारा, युद्धात आतापर्यंत ८०० हून अधिक जणांचा मृत्यू

●प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आखाती देशातल्या अनेक प्रमुखांशी चर्चा, परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्र सरकारकडून मंत्र्यांच्या समितीची स्थापना

●आखाती देशात अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांना २-३ दिवसात परत आणण्याचे राज्य सरकारचे प्रयत्न

**आणि**

●राज्याच्या अनेक भागात परंपरागत पद्धतीनं धूलिवंदन साजरे

**<><><><><>**

इराणविरुद्धचं युद्ध अनेक आठवडे चालू शकतं, अमेरिकेकडे दीर्घकाळ युद्ध करण्याची क्षमता आहे, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामीन नेत्यान्याहू यांनी या युद्धाचं समर्थन केलं होतं, त्याला दुजोरा देताना ट्रम्प यांनी हे विधान केलं आहे.

अमेरिका आणि  इस्त्रायलकडून आज पहाटेही तेहरानमधे क्षेपणास्त्रं डागली गेली. इराणही प्रत्युत्तरादाखल आखाती देश आणि इस्त्रायलवर हल्ले करत आहे.

अमेरिका-इस्त्रायलच्या हल्ल्यात ७८७ जणांचा मृत्यू झाल्याचं इराणी रेड क्रेसेंट सोसायटीने म्हटलं आहे. इराणच्या हल्ल्यात अकरा इस्त्रायली नागरिकांचा मृत्यू झाला आहे. तर इस्त्रायलने लेबननवर केलेल्या हल्ल्यात ५२ जणांचा  मृत्यू झाला आहे. अमेरिकेच्याही सहा सैनिकांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. परदेशी जहाजांवर काम करणाऱ्या तीन भारतीय खलाशांनाही या युद्धात  प्राण गमवावे लागले आहेत.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कतार, कुवेत, ओमान, सौदी अरेबिया, बहारीन यासारख्या देशांच्या प्रमुखांशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. यावेळी त्यांनी आखाती देशांमधल्या परिस्थितीविषयी चिंता व्यक्त केली आणि तिथे राहणाऱ्या भारतीयांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा केली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**<u>होल्ड व्हाइस कास्ट</u>**

*(पश्चिम आशियातल्या युद्धजन्य परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं मंत्र्यांची समिती स्थापन केली असून याची दैनंदिन बैठक घेतली जात असल्याची माहिती केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी दिली आहे.*

*हा संघर्ष थांबवण्यासाठी राजनैतिक उपाय योजण्याचे तसंच संवाद साधण्याचं आवाहन भारतानं पुन्हा केलं आहे. हा संघर्ष लवकरात लवकर संपवण्याच्या बाजूनं भारत आहे, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. जवळपास एक कोटी भारतीय आखाती देशात काम करतात, त्यांची सुरक्षितता भारतासाठी महत्त्वाची आहे, ज्या गोष्टीचा भारतावर थेट परिणाम होतो, त्यापासून भारत अलिप्त राहू शकत नाही असं या निवेदनात म्हटलं आहे. मध्य आशियातल्या अस्थिरतेचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो, भारताचे लोक जगभरात कामासाठी विखुरले आहेत, त्यामुळे भारत जहाजांवरच्या हल्ल्यांनाही ठामपणे विरोध करतो, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्त रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं.*

*पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर होर्मुजच्या सामुद्रधुनीतून येणारा तेल पुरवठा थांबला तर भारताकडे दहा कोटी बॅरल तेलाचा साठा शिल्लक असून हे तेल ४० ते ४५ दिवस पुरेल एवढं आहे. याबाबत सरकार समाधानी असून गरज पडली तर उपाययोजना केल्या जातील, असं पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी आज सांगितलं. भारताकडे तेल वाहतुकीसाठी पर्यायी मार्गही उपलब्ध आहेत.*

*परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी पेट्रोलियम मंत्रालयाने नियंत्रण कक्ष स्थापन केल्याचं पुरी यांनी म्हणाले.)*

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबई आणि अबू धाबीहून भारताकडे येणारी विमानसेवा काल रात्रीपासून अंशतः पुन्हा सुरू झाली असून त्यामुळे तिथं अडकलेल्या हजारो भारतीयांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दुबईत अडकलेल्या १४९ भारतीय प्रवाशांना घेऊन एअर इंडिया कंपनीचं पहिलं विमान आज भारतात परतलं. इंडिगो या विमान कंपनीने मध्यपूर्वेत अडकलेल्या भारतीय प्रवाशांसाठी विमानं सोडली आहेत. जेद्दाहसाठी आज चार विमानांचं उड्डाण झालं. मस्कत, जेद्दाह, मदिना आणि अथेन्स या चारही ठिकाणी मिळून २६ विमानं उड्डाणं केली जाणार आहेत. स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊनच संयुक्त अरब अमिरातीच्या दिशेनेही एक विमान पाठवण्यात येईल, असं इंडिगोने आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

या भागात अडकलेल्या राज्यातल्या १६४ जणांना परत आणण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन विमानांची व्यवस्था केली आहे. ती थोड्याच वेळात मुंबईत पोहोचणार आहेत. कोल्हापूरचे २३ पर्यटक दुबईहून इतिहाद कंपनीच्या विमानाने मुंबईत परतले आहेत.

**<><><><><>**

आखाती देशांमध्ये अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांना येत्या दोन ते तीन दिवसांत परत आणण्यात येईल असं मंत्री गिरीश महाजन म्हणाले. नाशिक इथे वार्ताहरांशी ते बोलत होते. अडकलेल्या नागरिकांशी संपर्क साधण्यासाठी राज्यशासनाने विशेष पथक नियुक्त केलं आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांच्या सुरक्षिततेविषयी माहिती घेतली जात असून भारतीय दूतावासांच्या माध्यमातून त्यांच्याशी संपर्क साधला जात आहे.

उमराह यात्रेसाठी राज्यातून सुमारे 45 हजाराच्या वर पर्यटक सौदी अरेबियात गेले आहे. या पर्यटकांना त्यांच्या राहण्याच्या सोयीसाठी भारतीय दूतावासाशी संपर्क साधायला तर सांगितलंच आहे परंतु यासाठी ट्रॅव्हल्स संचालकांकडून काय मदत होईल याची देखील चाचपणी करण्यात येत आहे अशी माहिती राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी दिली आहे.

आखाती देशांमध्ये अडकलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या १०२ जणांची माहिती जिल्हा प्रशासनाने संकलित केली आहे. त्यापैकी अत्यंत तातडीच्या मदतीची गरज असणाऱ्या ११ जणांची नाव राज्य शासनाकडे पाठवण्यात आली आहेत.

**<><><><><>**

राज्यसभेच्या ६ राज्यातल्या जागांसाठी आज भरतीय जनता पार्टीने ९ उमेदवारांची नावं जाहीर केली. नवनियुक्त पक्षाध्यक्ष नितिन नबीन यांना बिहार मधून उमेदवारी देण्यात आली आहे. हरियाणातले माजी लोकसभा सदस्य संजय भाटीया तसंच ओदिशातले राज्यसभेचे सदस्य सुजीतकुमार आणि माजी सदस्य मनमोहन सामल हे वगळता सर्व नवे चेहरे आहेत.

राज्यसभेच्या ३७ सदस्यांचा कार्यकाळ येत्या एप्रिलमधे संपत असल्याने १६ मार्चला ही निवडणूक होणार आहे. राज्यातल्या ७ सदस्यांचा त्यात समावेश असून अद्याप कोणत्याही पक्षाने उमेदवार जाहीर केलेले नाहीत.

**<><><><><>**

राज्यात आज सर्वत्र धुळवडीचा सण उत्साहाने साजरा केला जात आहे. होळीच्या नावाखाली दारू विक्री, अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सर्वत्र पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. राज्यातल्या विविध ठिकाणच्या होळीविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(मुंबईत ठिकठिकाणी रंग खेळून होळीचा सण साजरा केला गेला. घाटकोपरमध्ये राजावाडी गार्डन इथं बृहन्मुंबई महानगरपालिकेनं फुलांची होळी' या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं.*

***सिंधुदुर्गमध्ये*** *सावंतवाडीतल्या कलंबिस्त गणशेळवाडी इथल्या श्री देव धावगिरे देवस्थानच्या होळी उत्सवात 'निसर्ग रक्षणाचा' संकल्प करण्यात आला. यापुढे गावातल्या प्रत्येक व्यक्तीनं दरवर्षी किमान दोन आंब्याची झाडे लावायची आणि आंबा खाल्ल्यानंतर त्याच्या कोय फेकून न देता त्या जतन करून त्यातून नवीन रोप तयार करायची, असा संकल्प करण्यात आला.*

***यवतमाळमध्ये*** *होळीनिमित्त बंजारा समाजाचा पारंपारिक लेंगी उत्सव साजरा करण्यात आला. तसंच मारेगाव तालुक्यातील बोरी इथल्या संत गदाजी महारांच्या यात्रेत गोटमार होळी खेळण्यात आली.*

***जालनामध्ये*** *धुलिवंदनाच्यानिमित्त पारंपरिक 'हत्ती रिसाला' मिरवणूक काढण्यात आली. यावर्षी या मिरवणुकीचं यंदाचं १३८ वं वर्ष आहे.*

***जळगावमध्ये*** *काल सराफ बाजारातील भवानी माता मंदिरासमोरच्या मानाच्या होळीचं काल संध्याकाळी पूजन करण्यात आलं या प्रसंगी ८०० गोवऱ्यांची रास रचून होलिकादहन करण्यात आलं.)*

**<><><><><>**

रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदासाठीची निवडणूक येत्या १२ मार्चला होणार आहे. तिथे सर्वाधिक २१ जागा शिवसेनेकडे आहेत, पण भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊन सत्ता स्थापन करतील अशी चर्चा आहे. राष्ट्रवादीचे १६ तर भाजपाचे १५ सदस्य आहेत.

पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवडणूक येत्या १८ मार्चाला होईल. तिथे राष्ट्रवादी काँग्रेसला स्पष्ट बहुमत असून अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाचे उमेदवार अध्यक्ष सुनेत्रा पवार निवडणार आहेत.

**<><><><><>**

जाहिरातींच्या माध्यमातून महसूल वाढवण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असून पुढच्या पाच वर्षांत अडीचशे कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळवण्याचं लक्ष्य असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीत ते आज बोलत होते.

**<><><><><>**

ज्येष्ठ नेते, माजी खासदार, माजी कुलगुरू, प्रख्यात विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या पार्थिवावर आज औसा तालुक्यातल्या कवठा या त्यांच्या मूळगावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. वाघमारे हे नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ चे पहिले कुलगुरू होते. वर्ष २००१ मध्ये लातूरचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील कदमापूर जिल्हा परिषद शाळेवरील शिक्षक राजेश कोगदे यांनी आपल्या वर्गातील एकही विद्यार्थी गणित विषयात मागे राहू नये याकरिता केवळ प्लास्टिक पाईपपासून गणकयंत्र बनवलं आहे. या गणकयंत्रासाठी कोणतीही बॅटरी किंवा इलेक्ट्रिक साधनाची गरज नाही. या गणकयंत्रावर विद्यार्थी बेरीज, वजाबाकी आणि गुणाकाराची उत्तरे पडताळून पाहू शकतात. ज्या विद्यार्थ्यांना गणित विषयात अजिबात आवड नाही त्या विद्यार्थ्यांना खेळातून गणित शिकता येत असल्याने गणित विषयात आवड निर्माण होत आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात दक्षिण मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त तापमान अकोला इथं ३८ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट वातावरण राहील तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//